दिनांक  20/02/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.144

विषय – विटा नगरपरिषदेकडील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत DPR-2 व DPR-3 मधील काम सुरू न केलेल्या लाभार्थ्याची नावे DPR मधून वगळून सुधारीत DPR करून सदरचा प्रस्ताव मंजूरीसाठी नगपरिषद संचलनालयाकडे पाठवणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 20/02/2023 CLTC Engg व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/म्हाडा तथा अभियान संचालक/प्र.आ.यो. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचेकडील दि. 15/09/2021 रोजीचे पत्रानुसार प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत DPR-2 व DPR-3 मध्ये बदल करण्याचे व सदर DPR मधील काम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांची नावे DPR मधून वगळून सुधारीत DPR करणेचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

विटा नगरपरिषदेकडील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत DPR-2 मध्ये एकूण 150 लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले होते. त्यामधील 5 लाभार्थ्यांनी अद्यापही कामे सुरू केलेली नाहीत. तसेच DPR-3 मध्ये एकूण 115 लाभायचे प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले होते. त्यामधील 7 लाभार्थ्यांनी अद्यापही कामे सुरू केलेली नाहीत. सदर लाभार्थ्यांना वारंवार सुचना व नोटीस देवूनही कामे सुरू केली नाहीत. त्यावरून असे निदर्शनास आले आहे की, सदर लाभार्थ्यांची आर्थिक व मानसिक स्थिती नसलेने ते काम करण्यास इच्छुक नाहीत, तरी विटा नगरपरिषदेकडील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत DPR-2. व DPR-3 मधील काम सुरू न केलेल्या लाभार्थ्यांची नावे DPR मधून वगळून सुधारीत DPR मंजूरीसाठी नगरपरिषद संचलनालयाकडे पाठविणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा